Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन

सत्याचे प्राईम्स

सम्राट टाईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

धरणगावच्या सुमा नायरचे यश!

(पान २ वर)



। बुधवार, दि. १४ ऑक्टोंबर २०२६ । वर्ष १ । अंक १८३ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

Selected

अल्पभूधारक शेतकऱ्याची आत्महत्या

किनोद, जि. जळगाव। जळगाव जिल्ह्यातील किनोद येथील अल्पभूधारक शेतकरी ज्ञानेश्वर बाबुराव सपकाळे (वय ४०) यांनी मंगळवारी, १३ ऑक्टोबर २०२६ रोजी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे किनोद परिसरात हळहळ व्यक्त होत असून, त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. प्राथमिक माहितीनुसार, ज्ञानेश्वर सपकाळे हे कठोरा येथे आपल्या वडिलोपार्जित शेतीची मशागत करीत होते. त्यांच्या शेतीवर विकासो सहकारी सोसायटीचे कर्ज असल्याची माहिती मिळाली आहे. कर्जाचा वाढता भार आणि आर्थिक अडचणींच्या पार्श्वभूमीवर त्यांनी टोकाचे पाऊल उचलल्याची चर्चा आहे. मात्र, आत्महत्येमागील नेमकी कारणे अधिकृत तपासानंतरच स्पष्ट होतील.पत्नी, मुलगी आणि मुलगा निराधार ज्ञानेश्वर सपकाळे यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी आणि एक मुलगा असा परिवार आहे.

पक्ष, धनुष्यबाण चिन्ह आणि आमदारांच्या अपात्रतेचा पेच कायम; उर्वरित युक्तिवादासाठी वेळ लागण्याची शक्यता

शिवसेना पक्ष-चिन्हाच्या निकालासाठी प्रतीक्षा वाढणार ?

न्यायमूर्ती व्ही. मोहना अनुपस्थित; सुनावणी पुढे ढकलल्याने दिवाळीनंतर निकालाची शक्यता

जन सम्राट टाईम्स

मुंबई | महाराष्ट्राच्या राजकारणाचे भवितव्य ठरविणाऱ्या शिवसेना पक्ष, 'धनुष्यबाण' चिन्ह आणि आमदारांच्या अपात्रतेशी संबंधित प्रकरणातील निकालासाठी आणखी प्रतीक्षा करावी लागू शकते. सर्वोच्च न्यायालयात मंगळवारी, १३ ऑक्टोबर रोजी होणारी सुनावणी न्यायमूर्ती व्ही. मोहना अनुपस्थित असल्याने होऊ शकली नाही. त्यामुळे ऑक्टोबरअखेर निकाल लागण्याच्या चर्चांना अनिश्चिततेचे सावट निर्माण झाले आहे.

ठाकरे गटाचे या प्रकरणातील वकील असीम सरोदे यांनी उर्वरित युक्तिवादासाठी लागणारा वेळ लक्षात घेता दिवाळीनंतर निकाल लागण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

उर्वरित युक्तिवादासाठी अनेक ज्येष्ठ वकील

असीम सरोदे यांच्या म्हणण्यानुसार, यापूर्वी ३० ऑक्टोबरपर्यंत सुनावणी पूर्ण होऊन दिवाळीपूर्वी निकाल येईल, अशी अपेक्षा होती. मात्र, शिंदे गटाकडून ज्येष्ठ वकील नीरज किशन कौल यांच्या युक्तिवादानंतर अन्य महत्त्वाच्या मुद्द्यांवरही युक्तिवाद होणे बाकी आहे.

धनुष्यबाण चिन्हासंदर्भात ज्येष्ठ वकील ध्रुव मेहता आणि



मुकुल रोहतगी यांच्याकडून, तर अपात्रतेच्या मुद्द्यावर ज्येष्ठ वकील मणिंदरसिंग यांच्याकडून युक्तिवाद होण्याची शक्यता आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या बाजूने ज्येष्ठ वकील शेषाद्री नायडू, तर केंद्रीय निवडणूक आयोगाच्या बाजूने अरविंद दातार आपली भूमिका मांडणार असल्याची माहिती सरोदे यांनी दिली.

या सर्व युक्तिवादांनंतर ठाकरे गटाची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांना अंतिम उत्तरासाठी वेळ द्यावा लागेल. त्यामुळे सुनावणी पूर्ण होण्यासाठी आणखी काही दिवस लागू शकतात.

१६ आमदारांच्या अपात्रतेचा मुद्दा महत्त्वाचा

या प्रकरणात १६ आमदारांच्या प्राथमिक अपात्रतेशी संबंधित याचिकेचाही समावेश आहे. वेगवेगळे वकील अनेक आमदारांचे प्रतिनिधित्व करत असल्याने प्रत्येकाला आपली बाजू मांडण्यासाठी पुरेसा वेळ द्यावा लागणार आहे. त्याचबरोबर पक्षावरील हक्क आणि निवडणूक चिन्हाच्या प्रश्नावरही स्वतंत्र युक्तिवाद अपेक्षित आहेत.

सरोदे यांच्या मते, न्यायालयाने दररोज दुपारी २.३० नंतरचा संपूर्ण वेळ या प्रकरणासाठी दिला, तर सुनावणी लवकर पूर्ण होण्याची शक्यता आहे. अन्यथा अंतिम युक्तिवाद आणि त्यानंतरचा निकाल दिवाळीनंतर जाऊ शकतो. हा त्यांचा अंदाज असून, सर्वोच्च न्यायालयाने निकालाची निश्चित तारीख जाहीर केलेली नाही.

ठाकरे आणि शिंदे गटाच्या युक्तिवादांकडे लक्ष

शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाच्या वादात ठाकरे गटाने पक्षसंघटना, पक्षनेतृत्व आणि लोकशाही प्रक्रियेचे मुद्दे उपस्थित केले आहेत. शिंदे गटाने निवडणूक आयोगाच्या निर्णयाचे समर्थन करत पक्षातील बहुमत आणि संघटनात्मक परिस्थितीचा आधार घेतला आहे. आयोगाच्या निर्णयाची कायदेशीर वैधता आणि आमदारांच्या अपात्रतेचा प्रश्न या सुनावणीतील महत्त्वाचे मुद्दे आहेत.

महाराष्ट्राच्या राजकारणासाठी निकाल महत्त्वाचा

शिवसेनेचे नाव, पक्षावरील हक्क, धनुष्यबाण चिन्ह आणि आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय महाराष्ट्राच्या राजकारणावर दूरगामी परिणाम करू शकतो. त्यामुळे दोन्ही गटांसह राजकीय वर्तुळाचे लक्ष सर्वोच्च न्यायालयाच्या पुढील सुनावणीकडे लागले आहे. आता सुनावणी कधी पुन्हा सुरू होते, उर्वरित युक्तिवादासाठी किती वेळ मिळतो आणि न्यायालय निकाल राखून ठेवते का, यावर पुढील घडामोडी अवलंबून असतील. त्यामुळे ऑक्टोबरअखेर निकालाची अपेक्षा असली, तरी दिवाळीनंतरच अंतिम निर्णय येण्याची शक्यता असीम सरोदे यांनी व्यक्त केली आहे.

'ज्ञानेश कुमारांविरोधातील लढ्यात फूट पाडण्याचा डाव'; अभिजीत दिपके

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात मागील काही दिवसांपासून देशभरात विरोधक आंदोलन करत आहेत. ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी विरोधकांकडून करण्यात येत आहे. या मागणीच्या पार्श्वभूमीवर इंडिया आघाडी, कॉंक्रोच जनता पार्टीच्यावतीने दिल्लीत आंदोलन करण्यात येत आहे. त्यामुळे मागील काही दिवसांपासून दिल्लीत मोठ्या प्रमाणात पोलिसांचा फौजफाटा तैनात असून तणावाचं वातावरण निर्माण झालेलं आहे. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर बोलताना सीजेपीचे संस्थापक अध्यक्ष अभिजीत दिपके यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत एक मोठं वक्तव्य केलं आहे. इंडिया आघाडीच्या मोर्चावर अप्रत्यक्ष भाष्य करत केंद्र सरकार आपल्याला (इंडिया आघाडी आणि सीजेपी) एकमेकांविरोधात उभं करत आहे, असा आरोप अभिजीत दिपके यांनी केला आहे. पण आपण आपण एकजुटीने उभं राहायला हवं असंही दिपके यांनी म्हटलं आहे."जेव्हा कॉंक्रोच जनता पार्टीला आंदोलन करण्याची परवानगी मिळाली, तेव्हा अनेकांनी लगेच असे तर्क मांडले की आम्हाला भाजपानेच मुद्दाम तिथं पाठवलं होतं. 'इंडिया'आघाडीने काल एक मोठं आंदोलन केलं, पण १० ऑक्टोबरला आमच्या बाबतीत जशी कठोर कारवाई झाली, तसं इंडिया आघाडीबाबत काही घडलं नाही. केंद्र सरकार नेमकं याच पद्धतीने आपल्याला एकमेकांविरुद्ध उभं करतंय. वेगवेगळ्या आंदोलनांशी वेगवेगळ्या प्रकारे वागून देऊन



ते अशा लोकांमध्ये संशय आणि अविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत, जे मुळात एकाच ध्येयासाठी लढत आहेत", असा आरोप अभिजीत दिपके यांनी केला."माझी सर्वांना एक विनंती आहे की, त्यांनी वापरलेल्या या युक्त्या आणि डावपेच ओळखा. आज ते एका आंदोलनाला परवानगी देऊ शकतात आणि दुसरं आंदोलन दडपू शकतात. उद्या ते या भूमिकांची अदलाबदलही करू शकतात. सत्तेत असलेल्यांना जाब विचारण्याऐवजी आपण एकमेकांवरच संशय घेत राहावं, हाच त्यामागचा उद्देश आहे", असंही अभिजीत दिपके यांनी म्हटलं आहे."कट-कारस्थानांच्या अशा चर्चांमुळे आपल्यात फूट पडू देऊ नका. जेव्हा आपण एकजुटीने उभं राहायला हवं, तेव्हा आपापसात भांडणात अडकू नका. हा लढा ज्ञानेश कुमार आणि त्यांना संरक्षण देणाऱ्यांविरुद्ध आहे, हे कधीही विसरू नका", असं अभिजीत दिपके यांनी इंडिया आघाडीला उद्देशून म्हटलं आहे.कॉंक्रोच जनता पार्टीचे तीन सदस्य आशुतोष रांका, सौरव दास आणि अजिंक्य शिंदे यांना दिल्ली पोलिसांनी आज पुन्हा एकदा ताब्यात घेतलं होतं. हे तिघंही जंतर-मंरच्या दिशेने निघाले होते, त्यामुळे दिल्ली पोलिसांनी ही कारवाई केली होती. सीजेपीचे संस्थापक अध्यक्ष अभिजीत दिपके यांनी पोस्ट करत ही माहिती दिली. शनिवारी म्हणजेच १० ऑक्टोबरला अभिजीत दिपके, सौरव दास आणि आशुतोष रांका यांना दिल्ली पोलिसांनी विमानातूनच ताब्यात घेतलं होतं. केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात मागील काही दिवसांपासून देशभरात विरोधक आंदोलन करत आहेत. ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी विरोधकांकडून करण्यात येत आहे. या मागणीच्या पार्श्वभूमीवर इंडिया आघाडी, कॉंक्रोच जनता पार्टीच्यावतीने दिल्लीत आंदोलन करण्यात येत आहे. त्यामुळे मागील काही दिवसांपासून दिल्लीत मोठ्या प्रमाणात पोलिसांचा फौजफाटा तैनात असून तणावाचं वातावरण निर्माण झालेलं आहे. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर बोलताना सीजेपीचे संस्थापक अध्यक्ष अभिजीत दिपके यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत एक मोठं वक्तव्य केलं आहे. इंडिया आघाडीच्या मोर्चावर अप्रत्यक्ष भाष्य करत केंद्र सरकार आपल्याला (इंडिया आघाडी आणि सीजेपी) एकमेकांविरोधात उभं करत आहे.

SIR प्रक्रियेला मुदतवाढ; २६ ऑक्टोबरपर्यंत दावे-हरकती दाखल करा!

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेला (SIR) मुदतवाढ देण्यात आली असून, नागरिकांना दावे आणि हरकती दाखल करण्यासाठी २६ ऑक्टोबरपर्यंत संधी मिळणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. प्रारूप मतदार यादीतून नाव वगळले गेलेल्या नागरिकांसह नावाचे स्पेलिंग, वैयक्तिक तपशील किंवा अन्य नोंदींमध्ये दुरुस्ती करू इच्छिणाऱ्या पात्र मतदारांना या मुदतवाढीचा लाभ घेता येणार आहे. मुख्यमंत्र्यांनी सोशल मीडियावरील पोस्टद्वारे पात्र मतदारांना विहित मुदतीत दावे नोंदी आणि हरकती दाखल करण्याचे आवाहन केले आहे. संबंधित निवडणूक अधिकारी कार्यालयात तसेच उपलब्ध ऑनलाइन सुविधांद्वारे अर्ज करता येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. १६ नोव्हेंबरला अंतिम मतदार यादी जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार, दावे आणि हरकती दाखल करण्याची अंतिम मुदत २६ ऑक्टोबर आहे. प्राप्त अर्जांची छाननी करून त्यावर १० नोव्हेंबरपर्यंत निर्णय घेण्याचे नियोजन आहे.

त्यानंतर आवश्यक दुरुस्त्या पूर्ण करून १६ नोव्हेंबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. मतदारांनी तपासण्याचे आवाहन करणे महत्त्वाचे ठरणार आहे.



प्रारूप मतदार यादीत नाव नसणे, नावाच्या स्पेलिंगमध्ये चूक असणे किंवा वैयक्तिक तपशिलांमध्ये दुरुस्ती आवश्यक असणे अशा प्रकरणांत नागरिकांनी आपली नोंद तपासून घ्यावी. पात्र असूनही नाव वगळले गेले असल्याचे आढळल्यास संबंधित निवडणूक अधिकाऱ्यांकडे विहित प्रक्रियेनुसार दावा दाखल करावा. आवश्यक कागदपत्रांसह अर्ज वेळेत सादर करणे महत्त्वाचे ठरणार आहे. पाहता प्रारूप मतदार यादीतील SIR प्रक्रियेवरून राजकीय चर्चा विशेष सखोल मतदार पुनरीक्षण प्रक्रियेवरून विरोधी पक्षांनी आक्षेप नोंदवले असून, मतदार यादीतील त्रुटी आणि मतदारांची नावे वगळली जाण्याच्या मुद्द्यांवरून राजकीय चर्चा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर मुदतवाढीमुळे नागरिकांना आपले दावे आणि हरकती मांडण्यासाठी अतिरिक्त वेळ मिळणार आहे. मतदारांनी अंतिम मुदतीची वाट न आपले नाव आणि तपशील तपासावेत. आवश्यक असल्यास संबंधित निवडणूक अधिकाऱ्यांशी संपर्क साधून दावे किंवा हरकती २६ ऑक्टोबरपूर्वी दाखल कराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेला (SIR) मुदतवाढ देण्यात आली असून, नागरिकांना दावे आणि हरकती दाखल करण्यासाठी २६ ऑक्टोबरपर्यंत संधी मिळणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. प्रारूप मतदार यादीतून नाव वगळले गेलेल्या नागरिकांसह नावाचे स्पेलिंग, वैयक्तिक तपशील किंवा अन्य नोंदींमध्ये दुरुस्ती करू इच्छिणाऱ्या पात्र मतदारांना या मुदतवाढीचा लाभ घेता येणार आहे.

सीबीजी प्रकल्पांसाठी टास्क फोर्स स्थापन करा

मुंबई : राज्यातील शहरांना कचरामुक्त करण्यासोबतच कचऱ्यापासून कॉम्प्रेस्ड बायोगॅस (सीबीजी) निर्मितीला चालना देण्यासाठी प्रकल्प उभारणीसंदर्भात टास्क फोर्स स्थापन करण्यात यावेत. मुख्यमंत्री फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी कचरामुक्त शहरे आणि कॉम्प्रेस्ड बायोगॅस (सीबीजी) प्रकल्पांबाबत आयोजित बैठकीत प्रस्तावित प्रकल्पांचा आढावा घेतला. यावेळी राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव के. एच. गोविंदराज आदी यावेळी उपस्थित होते.

नवीन वर्षाला महामार्गांवर 'हवाई रुग्णवाहिका' सेवा

जन सम्राट टाईम्स



मुंबई | प्रतिनिधी: राज्यातील महामार्गांवर होणाऱ्या गंभीर रस्ते अपघातांतील जखमींना वेळेत वैद्यकीय उपचार मिळावेत आणि त्यांचे प्राण वाचविण्यास मदत व्हावी, या उद्देशाने 'हवाई रुग्णवाहिका' सेवा सुरू करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. अपघातानंतरचा पहिला तास, म्हणजेच 'गोल्डन अवर', हा जखमींच्या उपचारांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असतो. या निर्णायक काळात जखमींना तातडीने ट्रॉमा केअर सेंटरपर्यंत पोहोचविण्यासाठी हवाई रुग्णवाहिका सेवा प्रभावी ठरू शकते, अशी भूमिका परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मांडली. या अनुषंगाने आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, गृहराज्यमंत्री योगेश कदम, परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, आरोग्य विभागाचे संचालक संजय कांटकर वाहतूक पोलीस विभागाचे अधीक्षक डॉ सुनील भारद्वाज यांच्यासह मोटार परिवहन विभाग, आरोग्य विभाग आणि पोलीस प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या प्रकल्पासाठी १५ नोव्हेंबरपर्यंत प्रमाणित कार्यपद्धती तयार करून तिला मंजुरी घेण्याचे नियोजन आहे. त्यानंतर नोव्हेंबरअखेर उच्चाधिकार समितीची मंजुरी घेऊन निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. या प्रक्रियेनंतर नवीन वर्षाच्या सुरुवातीला हवाई रुग्णवाहिका सेवा सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.राज्यात दरवर्षी सुमारे १५ हजार रस्ते अपघात होत असल्याची माहिती आहे. यापैकी अनेक अपघातांमध्ये जखमींना वेळेत उपचार मिळणे हे मोठे आव्हान ठरते. विशेषतः महामार्गांवरील गंभीर अपघात, वाहतूक कोंडी, रुग्णालयापर्यंतचे अंतर आणि आपत्कालीन वैद्यकीय सुविधांची उपलब्धता या बाबी लक्षात घेता, अपघातग्रस्तांना तातडीने उपचार मिळण्यासाठी अधिक सक्षम यंत्रणा उभारण्याची आवश्यकता आहे.समृद्धी महामार्ग, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग आणि मुंबई-गोवा महामार्ग या महत्त्वाच्या मार्गांवर अपघातग्रस्तांना जलद वैद्यकीय मदत मिळावी, यासाठी विशेष यंत्रणा उभारण्याचे नियोजन आहे. या यंत्रणेअंतर्गत हवाई रुग्णवाहिका सेवेची उपलब्धता, जखमींना सुरक्षितपणे ट्रॉमा केअर सेंटरपर्यंत पोहोचविण्याची कार्यपद्धती आणि विविध आपत्कालीन यंत्रणांमधील समन्वय यांवर विशेष भर देण्यात येणार आहे. हवाई रुग्णवाहिका सेवेसह अपघातग्रस्तांना तातडीने मदत मिळण्यासाठी परिवहन विभाग, आरोग्य विभाग आणि पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रमाणित कार्यपद्धती निश्चित करण्यात येणार आहे. यासाठी ट्रॉमा केअर सेंटरचे जाळे निश्चित करणे, सेवा पुरवठादारांचे पॅनेल तयार करणे, रस्ता सुरक्षा निधीतून आवश्यक आर्थिक तरतूद करणे आणि आपत्कालीन प्रतिसादासाठी प्रमाणित कार्यपद्धती विकसित करणे, अशा उपाययोजनांवर भर दिला जाणार आहे.रस्ते अपघात रोखणे ही शासनाची प्राथमिक जबाबदारी आहेच; मात्र अपघात घडल्यानंतर जखमींना वेळेत उपचार मिळणेही तितकेच महत्त्वाचे आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि वेगवान आपत्कालीन वैद्यकीय सेवांच्या मदतीने रस्ते अपघातांतील मृत्यूंचे प्रमाण कमी करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

ऊस दर प्रश्नासाठी पुणे - बेंगळुरु राष्ट्रीय महामार्गावर आंदोलन सुरु

सांगलीत आंदोलन तापले; पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे बंद

जन सम्राट टाईम्स

ठाणे । प्रतिनिधी: केंद्र सरकारसोबत झालेली चर्चा निष्फळ ठरल्यानंतर मंगळवारी महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील कोगनोळी टोल नाक्यावर ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू केले. माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या या आंदोलनामुळे पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आली आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या २५ व्या ऊस परिषदेत ठरल्याप्रमाणे साखरेचा किमान विक्री हमी भाव प्रतिकिलो ५० रुपये करावा, सी-हेवी मोलॅसिसपासून तयार होणाऱ्या इथेनॉलचा दर प्रतिलिटर ७० रुपये करावा आणि लवकर गळीत हंगाम सुरू होत असल्याने शेतकऱ्यांना प्रतिटन ५०० रुपये अनुदानसह प्रतिटन ५ हजार रुपये दर मिळावा या तीन प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन पुकारण्यात आले आहे. काल नवी दिल्ली येथे केंद्रीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री प्रल्हाद जोशी आणि केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्यासोबत झालेल्या तीन तासांच्या बैठकीत कोणताही ठोस निर्णय न होता केवळ एका आठवड्यात समिती स्थापन करून निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले होते. बैठक निष्फळ ठरल्यानंतर आज कोगनोळी टोल नाक्यावर हजारो शेतकरी दाखल झाले. यावेळी राजू शेट्टी यांनी केंद्र सरकार लेखी निर्णय जाहीर करत नाही तोपर्यंत महामार्ग एक इंचही मोकळा केला जाणार नाही,



१५ नोव्हेंबरपूर्वी एकही साखर कारखाना सुरू करू देणार नाही. तातडीने तोडगा न काढल्यास कारखान्यातून बाहेर पडणारी साखरही अडवण्याचा, आंदोलन उग्र करण्याचा इशारा दिला आहे.आंदोलन बेमुदत चालणार असल्याने महामार्गावरच अन्नछत्र आणि जेवणाच्या पंगतींची तयारी करण्यात आली आहे. कागल, निपाणी तालुक्यातील गावांमधून भाकरी-पिठलं गोळा करून तिथेच मुक्काम ठोकण्याची तयारी करण्यात आली आहे. आंदोलक शेतकऱ्यांनी महामार्गावरच पंगत टाकून जेवण केले.कोगनोळी सोबतच हत्तरगी, कराड, सातारा, इंदापूर आणि कर्नाटकातील हुबळी, गदग परिसरातही महामार्ग रोखण्यात आले आहे..पोलिस प्रशासनाने वाहतूक पर्यायी मार्गाने वळवली आहे. पलूस तालुक्यात शंभरावर उसाची वाहने अडवण्यात आल्याचे सांगण्यात आले. भर उन्हातील आंदोलनात शेतकऱ्यांचा मोठा सहभाग असल्याने मोठ्या छावणीचे स्वरूप आले आहे.राज्य साखर संघाचे माजी अध्यक्ष दिलीप वळसे पाटील यांनी साखर कारखाने अडचणीत असल्याचा संदर्भ देत राजू शेट्टी यांना उद्देशून पहिली उचल ५ हजार रुपये द्यायला तुमच्या काकाने ठेवलेत का, अशा शब्दांत फटकारले.

बेमुदत चालणार आंदोलन

काल नवी दिल्ली येथे केंद्रीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री प्रल्हाद जोशी आणि केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्यासोबत झालेल्या तीन तासांच्या बैठकीत कोणताही ठोस निर्णय न होता केवळ एका आठवड्यात समिती स्थापन करून निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले होते. बैठक निष्फळ ठरल्यानंतर आज कोगनोळी टोल नाक्यावर हजारो शेतकरी दाखल झाले. यावेळी राजू शेट्टी यांनी केंद्र सरकार लेखी निर्णय जाहीर करत नाही तोपर्यंत महामार्ग एक इंचही मोकळा केला जाणार नाही, १५ नोव्हेंबरपूर्वी एकही साखर कारखाना सुरू करू देणार नाही. तातडीने तोडगा न काढल्यास कारखान्यातून बाहेर पडणारी साखरही अडवण्याचा, आंदोलन उग्र करण्याचा इशारा दिला आहे.आंदोलन बेमुदत चालणार असल्याने महामार्गावरच अन्नछत्र आणि जेवणाच्या पंगतींची तयारी करण्यात आली आहे.

भुसावळच्या श्री गजानन महाराज देवस्थानाच्या मालकी हक्कावर प्रश्नचिन्ह!

'श्री समर्थ महिला बहुउद्देशीय संस्थे'च्या नोंदणी, उद्दिष्टे आणि व्यवस्थापनाच्या अधिकारांबाबत खुलासा करण्याची मागणी

जन सम्राट टाईम्स

भुसावळ । प्रतिनिधी : भुसावळ येथील श्री गजानन महाराज देवस्थानाच्या जागेची मालकी आणि व्यवस्थापनाच्या अधिकारांबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. देवस्थानाच्या उभारणीत सर्वसामान्य भाविकांनी योगदान दिले असल्याचा दावा करत, देवस्थानाच्या व्यवस्थापनावर अधिकार सांगणाऱ्या 'श्री समर्थ महिला बहुउद्देशीय संस्थे'ची नोंदणी, उद्दिष्टे आणि कायदेशीर अधिकार यांची माहिती सार्वजनिक करण्याची मागणी वीर गुर्जर सेना तालुकाध्यक्ष प्रमोद जगन्नाथ पाटील यांनी केली आहे. देवस्थानाच्या मालकी व व्यवस्थापनाबाबत अधिकृत कागदपत्रांच्या आधारे वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी त्यांची भूमिका आहे.

देवस्थान उभारणीत लोकसहभागाचा दावा

श्री गजानन महाराज देवस्थानाच्या उभारणीसाठी भुसावळमधील नागरिकांनी लहान-मोठ्या स्वरूपात देणग्या दिल्या. समाजातील विविध घटकांतील नागरिक, ज्येष्ठ मंडळी, कामगार आणि लहान मुलांनीही या कार्यात योगदान दिल्याचे प्रमोद पाटील यांनी म्हटले आहे.

अनेकांच्या सहभागातून उभे राहिलेले हे श्रद्धास्थान असल्याने त्याच्या व्यवस्थापनात पारदर्शकता असावी आणि भाविकांच्या श्रद्धेचा सन्मान राखला जावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. देवस्थानाच्या उभारणीसाठी मिळालेल्या योगदानाची नोंद आणि व्यवस्थापनासंबंधीच्या निर्णयांची माहिती उपलब्ध करून देण्याची अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

संस्थेच्या नोंदणी आणि अधिकारांबाबत प्रश्न



श्री समर्थ महिला बहुउद्देशीय संस्था' या संस्थेच्या माध्यमातून देवस्थानाच्या व्यवस्थापनावर अधिकार सांगितला जात असल्याचा मुद्दा उपस्थित करत प्रमोद पाटील यांनी काही प्रश्न विचारले आहेत. संस्थेची कायदेशीर नोंदणी कोणत्या स्वरूपाची आहे, तिच्या नोंदणीकृत उद्दिष्टांमध्ये धार्मिक स्थळाचे व्यवस्थापन समाविष्ट आहे का आणि देवस्थानाचा कारभार पाहण्याचा अधिकार कोणत्या कागदपत्रांच्या आधारे प्राप्त झाला, याचा खुलासा करण्याची मागणी त्यांनी केली आहे. संस्थेची नोंदणी प्रमाणपत्रे, नियमावली, उद्दिष्टे आणि व्यवस्थापनासंबंधीची अधिकृत कागदपत्रे तपासणे आवश्यक आहे. या कागदपत्रांच्या पडताळणीनंतरच संस्थेच्या अधिकारांबाबत स्पष्ट निष्कर्ष काढता येईल. देवस्थानाच्या जागेच्या मालकीची पडताळणी करण्याची मागणी देवस्थान ज्या जागेवर उभे आहे, ती शासकीय खुली जागा असल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित जागेची मालकी कोणाच्या नावे आहे, जागेचा वापर कोणत्या परवानगीने केला जातो आणि देवस्थान उभारणीसाठी आवश्यक शासकीय मंजुरी घेण्यात आली होती का, याची माहिती सार्वजनिक करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या प्रकरणात जमिनीची मालकी आणि देवस्थानाच्या व्यवस्थापनाचा अधिकार हे स्वतंत्र मुद्दे आहेत. त्यामुळे महसूल विभागातील जमिनीच्या नोंदी, संबंधित परवानग्या आणि संस्थेची कागदपत्रे यांची पडताळणी महत्त्वाची ठरणार आहे. अधिकृत अभिलेख तपासल्यानंतरच या संदर्भातील वस्तुस्थिती स्पष्ट होऊ शकते.

भाविकांचा संभ्रम दूर करण्यासाठी पारदर्शकतेची अपेक्षा

देवस्थानाच्या व्यवस्थापनाचा अधिकार कायदेशीर कागदपत्रांच्या आधारे प्राप्त झाला असेल, तर संबंधित संस्थेने त्याची माहिती सार्वजनिक करावी. संस्थेची नोंदणी, उद्दिष्टे, व्यवस्थापनाची रचना आणि देवस्थानावरील नियंत्रणाचा कायदेशीर आधार याबाबत स्पष्टता आणावी, अशी मागणी प्रमोद जगन्नाथ पाटील यांनी केली आहे. श्री गजानन महाराज देवस्थान अनेक भाविकांच्या श्रद्धेशी जोडलेले असल्याने या विषयाची निष्पक्ष आणि कागदपत्राधारित पडताळणी होणे महत्त्वाचे आहे. संबंधित संस्थेची बाजू, महसूल अभिलेख आणि उपलब्ध अधिकृत कागदपत्रे तपासून वस्तुस्थिती जनतेसमोर आल्यास या विषयावर निर्माण झालेला संभ्रम दूर होण्यास मदत होईल. दरम्यान, संस्थेची बाजू आणि अधिकृत अभिलेखांमधील तपशील उपलब्ध झाल्यानंतरच मालकी व व्यवस्थापनाच्या अधिकारांबाबत निश्चित निष्कर्ष काढता येईल.

संपादकीय

एमपीएससी आंदोलनाची फलश्रुती काय? विद्यार्थ्यांचा विजय की आश्वासनांची नवी परीक्षा?

रोहित पवारांच्या नेतृत्वाखालील आंदोलनाने सरकारला निर्णय घेण्यास भाग पाडले; मात्र चौकशी समिती, तुकाराम मुंढे यांची नियुक्ती आणि अध्यक्षांची रजा एवढ्यानेच पारदर्शकतेचा प्रश्न सुटणार नाही! महाराष्ट्रातील लाखो तरुणांसाठी स्पर्धा परीक्षा ही केवळ नोकरी मिळविण्याची प्रक्रिया नाही, तर त्यांच्या कुटुंबाच्या आशा-आकांक्षांचा, वर्षानुवर्षांच्या मेहनतीचा आणि उज्ज्वल भविष्याचा आधार आहे.

अशा परिस्थितीत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षांमधील कथित पेपरफुटी आणि अनियमिततेच्या आरोपांनी विद्यार्थ्यांमध्ये असंतोष निर्माण होणे स्वाभाविक आहे. पुण्यात सलग अकरा दिवस सुरू राहिलेल्या आंदोलनानंतर राज्य सरकारने चौकशी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला, ज्येष्ठ आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांची समितीच्या सचिवपदी नियुक्ती झाली आणि आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी चौकशी पूर्ण होईपर्यंत रजेवर जाण्याची घोषणा केली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आंदोलन स्थगित केले. मग या आंदोलनाची नेमकी फलश्रुती काय? रोहित पवार यांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनातून काय साध्य केले? आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, या घडामोडींमुळे एमपीएससीच्या कारभारावरील विश्वास पुन्हा प्रस्थापित होणार का? आंदोलनाने सरकारला निर्णय घेण्यास भाग पाडले! एमपीएससीच्या परीक्षांमधील कथित अनियमिततेच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी आयोगाच्या अध्यक्षांच्या राजीनाम्यासह चौकशी आणि जबाबदारी निश्चित करण्याच्या मागण्या पुढे आणल्या. सुरुवातीला मागण्यांवरून निर्माण झालेला तणाव कमी झाला नाही. मात्र आंदोलनाचा कालावधी वाढत गेला, विद्यार्थ्यांचा दबाव कायम राहिला आणि अखेर सरकारच्या प्रतिनिधींना आंदोलनस्थळी जाऊन चर्चा करावी लागली. या चर्चेनंतर चौकशी समितीची घोषणा, तुकाराम मुंढे यांचा समितीच्या सचिवपदी समावेश आणि चौकशीच्या काळात आयोगाच्या अध्यक्षांनी पदाच्या नियमित जबाबदाऱ्यांपासून दूर राहण्याचा निर्णय अशा महत्त्वाच्या घडामोडी घडल्या. त्यानंतर आंदोलन मागे घेण्याचा निर्णय झाला. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सामूहिक दबावामुळे सरकारला ठोस पावले उचलावी लागली, हे या आंदोलनाचे महत्त्वाचे फलित म्हणता येईल. मात्र आंदोलन मागे घेणे आणि विद्यार्थ्यांच्या सर्व समस्यांचे निराकरण होणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. सरकारने चौकशीची प्रक्रिया सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे; परंतु चौकशीचे निष्कर्ष, दोषींवरील कारवाई आणि भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी होणाऱ्या सुधारणा यांची अंमलबजावणी अद्याप महत्त्वाची आहे. त्यामुळे आंदोलनाला मिळालेला प्रतिसाद हा अंतिम विजय नसून उत्तरदायित्वाच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल मानले पाहिजे. रोहित पवार यांनी काय साध्य केले? या आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरदचंद्र पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी विद्यार्थ्यांच्या मागण्यांना राजकीय व्यासपीठ मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. आंदोलनस्थळी विद्यार्थ्यांसोबत उपस्थित राहणे, त्यांच्या मागण्या सरकारपर्यंत पोहोचविणे आणि चर्चेच्या प्रक्रियेत सहभागी होणे यामुळे हा प्रश्न केवळ विद्यार्थ्यांच्या मर्यादित आंदोलनापुरता राहिला नाही. काँग्रेसचे आमदार विश्वजित कदम आणि सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले यांचाही तोडगा काढण्याच्या प्रक्रियेत सहभाग होता. त्यामुळे या आंदोलनाचे श्रेय एका व्यक्तीपुरते मर्यादित ठेवणे योग्य ठरणार नाही. रोहित पवार यांच्या दृष्टीने या आंदोलनातून तीन बाबी साध्य झाल्याचे दिसते. पहिली म्हणजे, विद्यार्थ्यांच्या प्रश्नाला व्यापक सार्वजनिक आणि राजकीय चर्चेत स्थान मिळाले. दुसरी म्हणजे, चौकशी समिती स्थापन करण्याचा निर्णय प्रत्यक्षात आला. तिसरी म्हणजे, आयोगाच्या अध्यक्षांच्या भूमिकेबाबत विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर सरकारला तातडीने प्रतिसाद द्यावा लागला. परंतु या घडामोडींना राजकीय यशाचे अंतिम प्रमाणपत्र देणे घाईचे ठरेल. आंदोलनाच्या नेतृत्वाचे मूल्यमापन केवळ किती दिवस आंदोलन झाले किंवा कोणता नेता किती वेळ उपस्थित होता, यावरून होत नाही. विद्यार्थ्यांच्या मूळ मागण्या कितपत पूर्ण झाल्या, चौकशी किती स्वतंत्रपणे झाली आणि भरती प्रक्रियेत प्रत्यक्ष सुधारणा झाल्या का, हेच दीर्घकालीन मूल्यमापनाचे निकष असतील.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

नाशिक विभागीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत साध्वी चौधरी अव्वल!

जन सम्राट टाईम्स

भडगाव | प्रतिनिधी : वजन उचलण्याच्या खेळात ताकद, तंत्र, सातत्य आणि आत्मविश्वासाच्या जोरावर गोपीचंद पुना पाटील विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, कोळगाव येथील राष्ट्रीय खेळाडू कु. साध्वी प्रल्हाद चौधरी हिने पुन्हा एकदा आपल्या गुणवत्तेची छाप उमटवली आहे. नाशिक विभागीय शालेय वेटलिफ्टिंग स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलींच्या ६९ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक पटकावत तिने सुवर्णपदकाला गवसणी घातली. या शानदार कामगिरीच्या बळावर साध्वीची अमरावती येथे होणाऱ्या शालेय राज्यस्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विभागीय स्पर्धेत १६० किलो वजन उचलले साध्वीने विभागीय स्पर्धेत स्नॅच प्रकारात ७५ किलो, तर क्लीन अँड जर्क प्रकारात ८५ किलो, असे एकूण १६० किलो वजन उचलून अव्वल स्थान मिळविले. तिच्या या दमदार कामगिरीने पुन्हा एकदा तिची मेहनत, सरावातील सातत्य आणि स्पर्धात्मक क्षमता अधोरेखित झाली आहे. यापूर्वी जिल्हास्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेतही साध्वीने ६९ किलो वजनी गटात एकूण १४० किलो वजन उचलून प्रथम क्रमांक मिळविला होता. जिल्हास्तरीय यशानंतर विभागीय स्तरावरही तिने आपली कामगिरी उंचावत सुवर्णपदक पटकावले. राष्ट्रीय स्तरावरही सुवर्णपदकांची कमाई साध्वी चौधरी हिने यापूर्वी दोन वेळा शालेय राष्ट्रीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत, तसेच एकदा वेटलिफ्टिंग फेडरेशनच्या राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक मिळविले आहे. राष्ट्रीय स्तरावरील या यशानंतर



विभागीय स्पर्धेतही तिने अव्वल स्थान कायम राखल्याने तिच्या क्रीडाप्रवासातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. तिच्या या यशामागे आई-वडील प्रल्हाद चौधरी व मीनाक्षी चौधरी यांचे प्रोत्साहन आणि विद्यालयातील मार्गदर्शकांचे योगदान महत्त्वाचे ठरले आहे. पर्यवेक्षक तथा आदर्श क्रीडा शिक्षक बी. डी. साळुंखे, ज्येष्ठ शिक्षक प्रा. रघुनाथ अरविंद पाटील आणि राष्ट्रीय खो-खो पंच प्रा. प्रेमचंद चौधरी यांचे तिला मार्गदर्शन लाभत आहे. विद्यालयाच्या वतीने अभिनंदन साध्वीच्या यशाबद्दल कर्मवीर तात्यासाहेब हरि रावजी पाटील किसान शिक्षण संस्थेचे अध्यक्ष नानासाहेब प्रतापराव पाटील, उपाध्यक्षा डॉ. पुनमताई पाटील, मंत्रालयीन उपसचिव दादासाहेब प्रशांतराव पाटील, प्राचार्य आर. आर. वळखंडे, पर्यवेक्षक बी. डी. साळुंखे, प्रभारी कार्यवाहक मनोजकुमार पवार यांच्यासह विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तिचे अभिनंदन केले. आता अमरावती येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत साध्वी कशी कामगिरी करते, याकडे क्रीडाप्रेमींचे लक्ष लागले आहे. तिच्या सातत्यपूर्ण यशामुळे गो.पु. पाटील विद्यालयाच्या क्रीडा परंपरेत मानाचा तुरा रोवला गेला असून, राज्यस्तरावरही ती पदक मिळवेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

धरणगावच्या सुमा नायरचे यश!

वडील टेलरिंग व्यावसायिक... कन्येची लंडनपर्यंत भरारी

जन सम्राट टाईम्स

जळगाव। प्रतिनिधी : जिल्ह्यातील धरणगावात टेलरिंग व्यवसायातून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत मुलीच्या उच्च शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करणाऱ्या सेलवा नायर यांची कन्या सुमा नायर हिने लंडनमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. मिडलसेक्स विद्यापीठातून एमबीएचे शिक्षण डिस्टिंक्शनसह पूर्ण केल्यानंतर तिला बर्कले लंडन हेडक्वार्टर या कंपनीत सिस्टीम इंजिनिअर म्हणून नोकरीची संधीही मिळाली आहे. वडिलांच्या कष्टांना मुलीच्या गुणवत्तेची जोड मिळाल्याने नायर कुटुंबीयांचा आनंद द्विगुणित झाला असून तिच्या यशाचे कौतुक होत आहे. सुमा ही धरणगाव येथील क्लिफ टेलरचे संचालक सेलवा नायर आणि सत्यभामा नायर यांची कन्या. तिचे प्राथमिक शिक्षण धरणगावातील गुड शेफर्ड शाळेत झाले. माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण जळगावात पूर्ण केल्यानंतर तिने शिरपूर येथील आर.सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमधून बी. टेक.ची पदवी संपादन केली. शालेय शिक्षणापासूनच पुढे जाण्याची जिद्द बाळगणाऱ्या



सुमाने अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण करून माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात करिअरची सुरुवात केली. अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर सुमाने मुंबई येथील टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसमध्ये सॉफ्टवेअर डेव्हलपर म्हणून तीन वर्षे काम केले. या काळात तिने माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कामाचा अनुभव मिळवला. पुढील करिअरमध्ये प्रगती साधण्यासाठी व्यवस्थापन शिक्षण घेण्याचा निर्णय तिने घेतला. त्यानुसार शैक्षणिक कर्ज काढून लंडन येथील मिडलसेक्स विद्यापीठात एमबीए अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळवत तिने परदेशातील शैक्षणिक प्रवास सुरू केला.लंडनमध्ये एमबीएचे शिक्षण घेताना सुमाने अभ्यासात उल्लेखनीय कामगिरी केली. तिने हा अभ्यासक्रम डिस्टिंक्शनसह पूर्ण केला. या शैक्षणिक यशानंतर तिला बर्कले लंडन हेडक्वार्टर या कंपनीत सिस्टीम इंजिनिअर म्हणून काम करण्याची संधी मिळाली आहे. भारतातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील अनुभव, परदेशातील उच्च शिक्षण आणि स्वतःच्या गुणवत्तेच्या बळावर तिने लंडनमध्ये करिअरची नवी दिशा निश्चित केली आहे.सुमाच्या यशामागे तिचे वडील सेलवा नायर यांचे कष्ट आणि मुलीच्या शिक्षणाविषयीची तळमळ महत्त्वाची ठरली आहे. सेलवा नायर हे मूळचे केरळचे असून गेल्या ४० वर्षांपासून धरणगावात स्थायिक आहेत. ते टेलरिंग व्यवसायाच्या माध्यमातून आपला उदरनिर्वाह करतात. कपडे शिवण्याच्या व्यवसायातून कुटुंबाची जबाबदारी सांभाळतानाच त्यांनी मुलीच्या शिक्षणासाठी सातत्याने प्रयत्न केले. आर्थिक आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडत त्यांनी सुमाला उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. मुलीने उच्चशिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहावे आणि आपल्या कर्तृत्वाने कुटुंबाचे नाव उज्ज्वल करावे, ही त्यांची अपेक्षा होती. त्यांच्या पाठबळामुळेच सुमाला भारतात अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर लंडनमध्ये एमबीए करण्याची संधी मिळाली. पालकांचे कष्ट, शिक्षणावरील विश्वास आणि स्वतःची मेहनत यांच्या जोरावर परदेशातही यश मिळवता येते, हे सुमा नायरने दाखवून दिले आहे.

एका टेलरिंग व्यावसायिकाच्या मुलीने परदेशात उच्च शिक्षण पूर्ण करून नोकरी मिळविल्याने तिचा प्रवास अनेक विद्यार्थिनींसाठी प्रेरणादायी ठरत आहे. सुमाच्या यशामुळे नायर कुटुंबीयांसह धरणगाव परिसरात आनंदाचे वातावरण असून तिचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक केले जात आहे. टेलरिंग व्यवसायातून मुलीच्या शिक्षणासाठी केलेल्या प्रयत्नांचे यशात रूपांतर झाल्याने वैयक्तिक सेलवा नायर यांच्यासाठी हा अभिमानाचा क्षण ठरला आहे.

दुष्काळी परिस्थितीमुळे रोषमाळ बु. व छापरी येथील अश्व स्पर्धा रद्द!

जन सम्राट टाईम्स

धडगाव, जि. नंदुरबार | प्रतिनिधी : धडगाव तालुक्यात यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. सामाजिक परिस्थितीचे भान राखत धडगाव तालुक्यातील रोषमाळ बु. आणि छापरी येथे आयोजित करण्यात येणाऱ्या अश्व स्पर्धा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. धडगाव पोलीस प्रशासनाने केलेल्या आवाहनाला आयोजकांनी सकारात्मक प्रतिसाद देत स्पर्धा आयोजित न करण्याचे मान्य केले. पोलीस ठाण्यात महत्त्वाची बैठक सोशल मीडिया आणि व्हॉट्सॲपवर प्रसारित झालेल्या जाहिरातीनुसार, १८ ऑक्टोबर २०२६ रोजी रोषमाळ बु. येथे, तर ३१ ऑक्टोबर २०२६



रोजी छापरी येथे अश्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या संदर्भात १३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता धडगाव पोलीस ठाण्यात बैठक पार पडली. पोलीस निरीक्षक सुनील भानुदास भाबड यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या बैठकीत जिल्ह्यातील आणि तालुक्यातील दुष्काळजन्य परिस्थितीवर चर्चा करण्यात आली. अशा परिस्थितीत अश्व स्पर्धांचे आयोजन टाळावे, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले. आयोजकांची सहमती; स्पर्धा न घेण्याचा निर्णय पोलीस प्रशासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत आयोजकांनी यंदा स्पर्धा आयोजित न करण्याचे मान्य केले. बैठकीला अश्व स्पर्धांचे आयोजक हारसिंग मल्या पावरा, धनसिंग दादला पावरा, रोषमाळचे पोलीस पाटील राजू पावरा आणि फत्तेसिंग पावरा उपस्थित होते. त्यांनी पोलीस प्रशासनाच्या भूमिकेशी सहमती दर्शविली. त्यामुळे रोषमाळ बु. येथील १८ ऑक्टोबर आणि छापरी येथील ३१ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या अश्व स्पर्धा रद्द करण्यात आल्या.

उद्योगांच्या गुंतवणूकीत महाराष्ट्र सर्वात आघाडीवर

परदेशी विद्यापीठांना महाराष्ट्रात कॅम्पस सुरू करण्याची परवानगी

जन सम्राट टाईम्स

मुंबई। प्रतिनिधी : कौशल्य, भांडवल आणि तंत्रज्ञानाची सांगड घालणाऱ्या ठोस गुंतवणुकीसाठी महाराष्ट्रात उत्कृष्ट परिसंस्था कार्यरत आहे. सर्वच क्षेत्रातील उद्योगांच्या गुंतवणुकीसाठी असलेल्या परिसंस्थेच्या निर्मितीत महाराष्ट्र हा सर्वात आघाडीवर आहे, या शब्दात महाराष्ट्राचे महत्व अधोरेखित करीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी युनायटेड किंगडममधील संस्था आणि उद्योजकांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करण्याचे आवाहन केले. गुंतवणूकदारांचे प्रकल्प वेगाने पुढे नेण्यासाठी 'इन्व्हेस्ट महाराष्ट्र' व्यासपीठाच्या माध्यमातून सर्व संबंधित यंत्रणांशी तातडीने समन्वय साधला जाईल. यूके मधील सचिव, महापौर व अधिकारी यांचा हा दौरा केवळ औपचारिक भेट नसून दोन्ही देशांमधील महत्वाकांक्षेचे प्रत्यक्ष व्यवसाय आणि करारांमध्ये रूपांतर करण्याचा प्रयत्न असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. हॉटेल ताज पॅलेस येथे आयोजित महाराष्ट्र-यूके भागीदारी शुभारंभ कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अनबळगण, मुख्य



राजशिष्टाचार अधिकारी राजेश गवांदे, मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, युनायटेड किंगडमचे व्यवसाय, नवोन्मेष, विज्ञान आणि व्यापार राज्य सचिव जोनाथन रेनॉल्ड्स उपस्थित होते.यूकेच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळासोबत झालेल्या द्विपक्षीय चर्चांनंतर विविध महत्वाच्या क्षेत्रांतील सहकार्य वाढविण्यासाठी महाराष्ट्र आणि यूके दरम्यान झालेल्या सामंजस्य कराराचे आदान प्रदान करण्यात आले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मुंबई आंतरराष्ट्रीय वित्त, व्यापार आणि उद्योजकतेला जागतिक बाजारपेठांशी थेट जोडते. पुणे हे अभियांत्रिकी, वाहन उद्योग, उत्पादन आणि माहिती तंत्रज्ञानाचे प्रमुख केंद्र बनले आहे. राज्यभरातील कुशल मनुष्यबळ, सक्षम औद्योगिक समूह आणि जागतिक ग्राहकांना सेवा देणाऱ्या अनुभवी भागीदारांचे मजबूत जाळे ही महाराष्ट्राची ताकद आहे. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे परदेशी विद्यापीठांना महाराष्ट्रात कॅम्पस सुरू करण्याची परवानगी मिळाली आहे. 'युनिव्हर्सिटी ऑफ ब्रिस्टल', 'युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क' आणि 'युनिव्हर्सिटी ऑफ ॲबर्डिन' यासारखी जागतिक विद्यापीठे महाराष्ट्रात येत आहेत. राज्यात उभारण्यात येणाऱ्या एज्युसिटी, मेडिसिटी आणि एआय इनोव्हेशन सिटीमुळे जागतिक दर्जाचे संशोधन, संस्था आणि प्रतिभा एकत्र येतील.महाराष्ट्रात औद्योगिक कार्बन उत्सर्जन कमी करणे, ऊर्जा कार्यक्षमता, पाणी व्यवस्थापन, वाहतूक आणि साधनसंपत्तीचे पुनर्नवीकरण यासारख्या स्वच्छ ऊर्जा प्रकल्पांना मोठा वाव आहे. जागतिक कंपन्यांना त्यांची 'ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्स' आणि तंत्रज्ञान संशोधन केंद्रे महाराष्ट्रात उभारण्यासाठी राज्य शासन पूर्ण सहकार्य करेल, अशी ग्वाहीही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. या भागीदारीमुळे महाराष्ट्रातील स्थानिक उत्पादक, अन्नप्रक्रिया उद्योग, तंत्रज्ञान कंपन्या आणि लघुउद्योजकांना ब्रिटनमध्ये नव्या बाजारपेठा व ग्राहक मिळविण्याची संधी उपलब्ध होईल. येत्या काळात महाराष्ट्र आणि ब्रिटनमधील संबंध करारांपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष उद्योग, व्यवसाय आणि रोजगारनिर्मितीतून अधिक दृढ होतील, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

ऑल इंडिया पँथर सेनेच्या जळगाव जिल्हा युवक अध्यक्षपदी विकी गुरचळ!

जन सम्राट टाईम्स

जळगाव|प्रतिनिधी : ऑल इंडिया पँथर सेनेच्या जळगाव जिल्हा युवक अध्यक्षपदी विकी भाऊ गुरचळ यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे जिल्ह्यातील संघटनेच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, युवकांमध्ये संघटनात्मक कार्याला अधिक गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. ऑल इंडिया पँथर सेना ही दलित, बहुजन, शोषित आणि वंचित घटकांच्या हक्कांसाठी कार्य करणारी संघटना म्हणून ओळखली जाते. सामाजिक समता प्रस्थापित करणे, अन्यायाविरुद्ध आवाज उठविणे आणि वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे, ही संघटनेच्या कार्याची प्रमुख उद्दिष्टे आहेत. युवकांचे



संघटन मजबूत करण्याचे आव्हान विकी भाऊ गुरचळ यांच्या निवडीमुळे जळगाव जिल्ह्यात संघटनेचे कार्य अधिक व्यापक होण्याची अपेक्षा आहे. युवकांना संघटित करणे, सामाजिक प्रश्नांवर प्रभावीपणे भूमिका मांडणे आणि गरजू व वंचित घटकांच्या प्रश्नांसाठी पाठपुरावा करणे, अशी जबाबदारी आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

प्रदीप पूर्णेकर हत्या प्रकरणाला नवे वळण!

राजेंद्र शिंदेंची गुन्हे शाखेकडून चौकशी ; राम पूर्णेकर यांच्या आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर तपासाकडे लक्ष

जन सम्राट टाईम्स

ठाणे। प्रतिनिधी: शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे विभागप्रमुख प्रदीप पूर्णेकर यांच्या हत्या प्रकरणात ठाणे गुन्हे शाखेने शिवसेना विभागप्रमुख राजेंद्र शिंदे यांना चौकशीसाठी बोलावल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. माजी महापौर मीनाक्षी शिंदे यांचे पती असलेल्या राजेंद्र शिंदे यांच्या चौकशीमुळे या प्रकरणातील पुढील तपासाकडे लक्ष लागले आहे. दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिल्याचे सांगण्यात येत आहे. आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर तपासाकडे लक्ष प्रदीप पूर्णेकर यांच्या हत्येला दोन आठवडे उलटूनही न्याय मिळत नसल्याची खंत व्यक्त करत त्यांचे पुत्र राम पूर्णेकर यांनी आंदोलनाचा इशारा दिला होता. गरज पडल्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यातील निवासस्थानाबाहेर आंदोलनाला बसणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. या पार्श्वभूमीवर ठाणे गुन्हे शाखेने राजेंद्र शिंदे यांना चौकशीसाठी बोलावल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे तपासाच्या पुढील दिशेबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. मात्र, आंदोलनाचा इशारा आणि चौकशीची वेळ यांचा थेट संबंध असल्याचे अधिकृतरीत्या स्पष्ट झालेले नाही. गुन्ह्यातील सहभाग सिद्ध होणे नव्हे. पूर्णेकर कुटुंबीयांकडून गंभीर आरोप प्रदीप पूर्णेकर यांच्या हत्येनंतर त्यांचे बंधू जयनाथ पूर्णेकर आणि पुत्र राम पूर्णेकर यांनी मीनाक्षी शिंदे व राजेंद्र शिंदे यांच्याबाबत गंभीर आरोप केले होते. या प्रकरणातील काही आरोपींसोबत राजेंद्र शिंदे यांची छायाचित्रे समोर आल्याचा



